# *महाराष्ट्र विधानसभा*

*दिवसाच्या कामकाजाचा क्रम*
*शुक्रवार, दिनांक ३१ मार्च, २०१७*
*(सकाळी ११.०० वाजता)*

*एक : प्रश्नोत्तरे.*

*दोन : शासकीय विधेयक :*

*पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-*

*सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१७.*

*तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -*

*(१) वस्त्रोद्योग मंत्री : महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.*

*(२) मत्स्यविकास मंत्री : महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षांचा अनुक्रमे चाळीसावा व एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.*

*चार : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अकरावा अहवाल सादर करणे.*

*पाच : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).*

*सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :*

*(१) श्री. राजेश क्षीरसागर, डॉ सुजित मिणचेकर, सर्वश्री चंद्रदीप नरके, प्रकाश*

*आबिटकर, सुरेश हाळवणकर, उल्हास पाटील, राजन साळवी, सत्यजित पाटील, अमल महाडिक, सुनिल शिंदे वि.स.स.तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या सहा जिल्हयाकरिता कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्याची गत ३० वर्षापासून होत असलेली मागणी, मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन व्हावे याकरिता वारंवार निवेदने देऊनही कोणतीच कार्यवाही होत नसल्याने वकिलांनी १ डिसेंबर, २०१६ पासून सुरु केलेले उपोषण, यासदर्भात केंद्र शासनाने नेमलेल्या जसवंत सिंग आयोगाने खंडपीठ स्थापनेकरिता जे निकष दिले त्या निकषात कोल्हापूर तंतोतंत बसत असणे, उक्त खंडपीठाकरिता कोल्हापूरमध्ये वकिलांनी ५५ दिवस न्यायालयीन कामकाजावर टाकलेला बहिष्कार, उपरोक्त सहा जिल्हयातील १ कोटी ७५ लाख जनतेची व १७ हजार वकिलांच्या मागणीकडे शासन दूर्लक्ष करीत असल्याने उच्च न्यायालयात प्रलंबित खटल्यांच्या संख्येत होत असलेली वाढ, सद्यस्थितीमध्ये सुमारे ६२ हजार पेक्षा जास्त खटले प्रलंबित असणे, सदर खंडपीठ तात्काळ होण्याकरिता सहा जिल्हयातील लोकप्रतिनिधीना कोल्हापूर येथे खंडपीठ स्थापन करण्यासंदर्भात बैठक आयोजित करण्याचे आश्वासन देऊनही शासनामार्फत अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी नागरिक व वकिलांमध्ये पसरलेला असंतोष, मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूर येथे स्थापन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.''*

*(२) सर्वश्री. अतुल भातखळकर, विजय औटी, किशोर पाटील, सुनिल शिंदे, राजन साळवी, प्रशांत बंब, ॲड. राहुल कुल, श्री. संतोष दानवे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसुल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"राज्यातील बांधकाम व इतर व्यावसायीकांनी शासनाचे हजारो कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क बुडविले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, सदर प्रकरणी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून राज्यभरातील दोन हजार प्रकरणांची तपासणी सुरु असून त्यामध्ये नव्वद टक्के प्रकरणे बांधकाम व्यावसायीकांशी संबंधित असल्याचे निदर्शनास येणे, मुंबईतील एका बड्या बांधकाम व्यावसायीकाने सुमारे सहाशे कोटी रुपयांचे शुल्क बुडविले असल्याचेही निदर्शनास येणे, त्यामुळे हजारो कोटी मुद्रांक शुल्क बुडवणाऱ्या बांधकाम व इतर*

*व्यावसायिकांवर कारवाई करुन बुडीत मुद्रांक शुल्क वसुल करण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."*

*(३) सर्वश्री. चंद्रदीप नरके, सत्यजीत पाटील, ॲड. भीमराव धोंडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाने मंजुरीपेक्षा जादा गाळप करणा-या साखर कारखाना सुरु ठेवणेची मंजूरी रद्द करुन फौजदारी गुन्हे दाखल केले असणे, याशिवाय सुमारे २५ ते ५० लाखांची बँक हमी घेणे, साखर कारखाना उभारतांना गाळप क्षमतेप्रमाणे प्रदुषण नियंत्रण मंडळाची नियमानुसार मंजूरी घेऊन भौगोलिक परिस्थिती, कामगार यंत्रणा इत्यादी घटकांचा विचार करुन क्षमता वापर कमी जास्त १० टक्के गृहीत धरुन संपूर्ण यंत्रसामुग्री बसविण्यात येणे, साखर कारखाना सुरु झाल्यानंतर प्रतिदिन गाळप क्षमता पूर्ण होण्याच्या उद्देशाने यंत्रसामुग्रीची देखभाल पाहून १० टक्के जादाने क्रशींग दर लावला जात असणे, प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नियमानुसार जादा गाळप झाल्यास सदर दिवशी प्रदुषणाचे प्रमाण जादा होणे, तथापि, साखर कारखाना उभारतांना ज्याप्रमाणे कमी जास्तीची १० टक्के प्रमाणे यंत्रसामुग्री बसविली जाते त्याचा विचार करुन प्रदुषण नियंत्रणासाठी बसविण्यात आलेली यंत्रसामुग्री देखील १० ते २० टक्के जादाची बसवली असणे, यामुळे कमी जास्त प्रमाणात १० ते २० टक्के प्रदुषण जादा झाले तरी नियमानुसार प्रदुषण नियंत्रित केले जात असणे, प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नियमानुसार वाढीव गाळपासाठी नवीन मंजूरी घेणेसाठी कमीत कमी दोन वर्षाचा कालावधी लागत असल्यामुळे सध्या जे साखर कारखाने सद्यस्थिती सुरु असून त्यांना गाळप क्षमता वाढवावयाची आहे अशा साखर कारखान्यांना प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या विविध मंजुरीसाठी लागणारा कालावधी कमी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*सात : शासकीय विधेयके :*

*(अ) पुर:स्थापनार्थ :-*

*(१) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.*

*(२) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० — भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७.*

*(३) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०१७.*

---

*(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-*

*सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ — महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१७.*

*अशासकीय कामकाज*

*(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)*

*आठ : अशासकीय विधेयके :-*

*(अ) पुर:स्थापनार्थ :*

*सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २२ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ - ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांचे.*

*(ब) विचारार्थ :*

*(शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु, पुढे ढकलण्यात आलेली विधेयके - क्रमांक १ ते ४)*

*(१) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३३ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ - श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.*

*(२) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४५ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१६ - श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.*

*(३) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक १२ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) विधेयक, २०१६ - श्री.सुनिल प्रभु, वि.स.स. यांचे.*

*(४) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५२ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (चौथी सुधारणा) विधेयक, २०१६- श्री.मनोहर भोईर, वि.स.स.*

*यांचे.*

*विधान भवन,*
*मुंबई,*
*दिनांक : ३० मार्च, २०१७*

*डॉ. अनंत कळसे,*
*प्रधान सचिव,*
*महाराष्ट्र विधानसभा.*